RIGHT TO INFORMATION
सूचना का अधिकार

महाराष्ट्रशासन
महसूलववनविभाग
जिल्हाधिकारीवजिल्हादंडाधिकारीकार्यालय,रायगड-अलिबाग
हिराकोटतळयाजवळ,अलिबाग,ता.अलिबाग,जि.रायगड४०२२०१
❖दुरध्वनीक्र:०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२❖फॅक्सक्र:०२१४१-२२७४५१ईमेल:tahasildarmahasul@gmail.com❖

क्रमांक : साशा कार्या/ब-५/containment zone/रद्द आदेश/**पुष्प व्हॅली/विचुंबे-पनवेल**/२०२० दिनांक :१०/०६/२०२०.

**वाचले:-**

1. **महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिससूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०**
2. **महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील पत्र क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०**
3. **आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, कलम ३४**
4. **महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४३, ५६**
5. **भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७**
6. **महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाययोजना नियम, २०२०**
7. **तहसिलदार पनवेल यांचेकडील पत्र क्र.फौजदारी/कात-२/करोना विषाणू/संवेदनशिल क्षेत्र/२०२०, दि.१९/०४/२०२०**
8. **या कार्यालयाकडील आदेश क्र.साशा/कार्या-१/ब-५/करोना/रूग्ण/पनवेल-विचुंबे/२०२०, दिनांक १९/५/२०२०.**
9. **तहसिलदार पनवेल यांचेकडील पत्र क्र. फौजदारी/कात-२/करोना/PRCZ-००२/कंटेनमेंट झोन रद्द/२०२०, दिनांक ०९/६/२०२०**

---

**<u>आदेश,</u>**

ज्याअर्थी, उपोद्घातातील अ.क्र. ८ कडील आदेशान्वये रायगड जिल्हयातील पनवेल तालुक्यातील मौजे विचुंबे येथे १ कोरोना बाधित रुग्ण आढळल्याने, खालील क्षेत्र Containment Zone ( करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) व प्रतिबंध क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आलेले आहे.

**कोरोना बाधीत रुगण रहात असलेली मौजे विचुंबे येथील पुष्प व्हॅली सोसायटी, बी-विंग, रुम नं. २०७, विचुंबे, हे Epicenter व त्यापासुन पुर्वेस- प्रियंका पोळीभाजी केंद्र, दक्षीणेस स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा, विचुंबे, नैरुत्य — केरळा कॅफे, पश्चिमेस — बळी मार्केट, उत्तरेस- नदीची बाजू, ईशान्येस — सिंडीकेट बँक, हा परिसर / क्षेत्र.**

उपरोक्त Containment Zone मधील रुग्णाला रुग्णालयातून दि.१०/०५/२०२० रोजी डिस्चार्ज देण्यात आल्याबाबत व शेवटचा रुग्ण दि.१०/०५/२०२० रोजी बरा होऊन दि.०६/०६/२०२० रोजी २८ दिवसांचा कालावधी पुर्ण झाल्याबाबत व आजमितीस एकही नविन रुग्ण आढळून आलेला नसल्याने सदर Containment Zone रद्द करण्याबाबत तहसिलदार पनवेल यांनी दि.०९/०६/२०२० च्या पत्रान्वये कळविले आहे.

सबब वरील वस्तुस्थिती व तहसिलदार पनवेल यांचे दि.०९.०६.२०२० चे पत्र विचारात घेता, मौजे विचुंबे, ता. पनवेल, जि. रायगड येथील कोरोना बाधीत रुग्णाला रुग्णालयातून दि.१०/०५/२०२० रोजी डिस्चार्ज मिळाल्याने. तसेच या व्यक्तीच्या संपर्कात आलेल्या अन्य व्यक्तीही आद्याप पर्यंत कोरोना विषाणू मूळे संसर्ग झाल्याचे आढळून आलेले नाही, त्यामुळे मी निधी चौधरी, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड, या आदेशाव्दारे Containment Zone (करोना विषाणू बाधीत क्षेत्र) व प्रतिबंधीत म्हणून जाहीर केलेले, **कोरोना बाधीत रुगण रहात असलेली मौजे विचुंबे येथील पुष्प व्हॅली सोसायटी, बी-विंग, रुम नं. २०७, विचुंबे, हे Epicenter व त्यापासुन पुर्वेस- प्रियंका पोळीभाजी केंद्र, दक्षीणेस स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा, विचुंबे, नैरुत्य — केरळा कॅफे, पश्चिमेस — बळी मार्केट, उत्तरेस- नदीची बाजू, ईशान्येस — सिंडीकेट बँक, हा परिसर / क्षेत्र Containment Zone व प्रतिबंधीत क्षेत्रातून वगळण्याबाबतचे आदेश देत आहे.**

सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

सही--
**(निधी चौधरी)**
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष**
**आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड**

जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग Raigad-Alibag

प्रत :- मा.पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांना पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.
प्रत :- जिल्हा पोलीस अधिक्षक, रायगड-अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी, रा.जि.प.अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा शल्य चिकीत्सक, रायगड-अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- उप विभागीय अधिकारी पनवेल यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- तहसिलदार पनवेल यांना पुढील कार्यवाहीसाठी ,
प्रत :- आयुक्त, महानगरपालिका पनवेल यांना पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत :- वरीष्ठ पोलीस निरीक्ष्क, पनवेल यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी, पनवेल यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- गट विकास अधिकारी, पनवेल यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी, रायगड-अलिबाग यांना आवश्यक त्या प्रसिध्दिसाठी

(रविंद्र मठपती)
उपजिल्हाधिकारी (रोहयो) तथा
नोडल अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड